''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार'' - शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित

संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगाव.



मा. कार्याध्यक्षसो,
प्राचार्य अभयकुमार साळुंखे
७९ वा ज्ञानशिदोरी दिन विशेषांक





# स्नेहकुंज वार्तापत्र

संपादक : डॉ. बी. एम. पाटील | कार्यकारी संपादक : डॉ. एम. एस. उभाळे | अंक - ३ रा | वर्ष - २ ले | १७ जानेवारी २०२३

## संपादकीय



**प्र. प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील**

दरवर्षी साहेबांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून स्नेहकुंज अंकाचे प्रकाशन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण अंतर्गत बी. एड. आणि डीएलएड विद्यासमिती मार्फत मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या ७९ व्या वाढदिवसा निमित्त स्नेहकुंज कॉलेज वार्तापत्रकाचा ३ रा अंक प्रकाशित करताना आम्हा गुरुदेव कार्यकर्त्यांना अत्यानंद होत आहे. पहिल्या अंकाचे प्रकाशन मा. कार्याध्यक्षांच्या हस्ते शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे व संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या पवित्र स्थळी संपन्न झाले होते. स्नेहकुंज अंकाला विद्यार्थी, गुरुदेव कार्यकर्ते आणि शिक्षणप्रेमी लोकांच्या कडून भरभरुन प्रतिसाद मिळत आहे. याचे औचित्य साधून सदर अंक प्रकाशित होत आहे.

१७ जानेवारी हा दिवस ज्ञानशिदोरी म्हणून संस्थेतमध्ये साजरा केला जातो. सदर अंक प्रकाशनाचा मुख्य हेतु साहेबांच्या कार्यकर्तृत्वाची प्रचिती सर्व वाचक लोकांना कळावी म्हणून अनेक तज्ञांनी त्यांच्या व्यक्तीमत्त्वाचे सूक्ष्म विचार या अंकात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. साहेबांच्या काही पैलूंचा उलगडा करावा लागेल. याचे मुख्य कारण म्हणजे संस्थेत नव्याने शिक्षण सेवक व प्रशासकीय सेवक रुजू झालेले गुरुदेव कार्यकर्त्यांना तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याची प्रचिती वाचनातून अनुभवास मिळावी म्हणून या संपादकीय लेखाचा प्रपंच मांडत आहोत.

महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी स्वतःची अशी खास ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय करताना प्रथम कौटुंबिक पार्श्वभूमी लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यांचे वडिल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक संस्थापक डॉ. बापूजी साळुंखे व मातोश्री संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे आहेत. साहेबांना तीन बहिणी व दोन भाऊ असा त्यांचा गोतावळा आहे. साहेबांचा जन्म १७ जानेवारी १९४४ साली बेळगावातील होसूर येथे झाला. घरात त्यांना थोरमंडळी आवडीने बबन या नावाने संबोधतात.

साहेबांचे प्राथमिक शिक्षण ग्रामीण भागातील रुकडी गावापासून झाले व उच्च शिक्षण शिवाजी विद्यापीठात झाले . या कालावधीत मुख्य संस्कार डॉ. बापूजी साळुंखे व शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू मा. आप्पासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनखाली शिक्षण त्यांनी पूर्ण केले. यांच्या मार्गदर्शनामुळेच सध्या संस्थेचा वाढ, विकास आणि विस्तार होत आहे. समाजामध्ये संस्थेची विश्वासार्हता वाढविण्याचे कार्य साहेबांच्या हातून सातत्याने होत आहे.

साहेबांची नोकरीचा प्रारंभ संस्थेचे राजे रामराव महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून सुरुवात केली, तसेच प्राचार्य, सेक्रेटरी, संस्थेच अध्यक्ष, अशी विविध पदे त्यांनी भूषवलित तसेच सध्या कार्याध्यक्ष म्हणून संस्थेत कार्यरत आहेत. साहेबांच्या प्रशासकीय कार्यामुळेच संस्थेचा विस्तार, गुणवत्तेचे यशोशिखर गाठण्याची प्रचिती आपल्या सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांना आलेली पहावयास मिळते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे सेक्रेटरी पदाचा कार्यभार १९८५ साली स्विकारल्यावर संस्थेत ३३० संस्कृतिक केंद्रे कार्यरत होती. त्यावरुन सध्याच्या ४०७ संस्कृतिक केंद्रे जिल्ह्यात विद्याज्ञानाचे महान कार्य करत आहेत. अशा या महान व्यक्तिमत्त्वाचे आदर्श संस्कार, मार्गदर्शन, संस्थेतील गुरुदेव कार्यकर्त्यांनी घ्यावेत यासाठी सदर अंक आम्ही प्रकाशित करत आहोत.

हा अंक बी. एड. आणि डी. एल. एड. विभाग व्दारा संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय तासगाव मार्फत मा. कार्याध्यक्षसाहेब यांना सर्व शाखांचे प्राचार्य, प्राध्यापक, प्रशासकीय सेवक, प्रशिक्षणार्थीनी यांनी वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देवून त्यांना आई तुळजाभवानीच्या कृपेने उदंड आयुष्य मिळावे अशा हार्दिक शुभेच्छा !!!

स्नेहकुंज कॉलेज वार्तापत्रक प्रकाशित करण्याचा दुसरा मुख्य हेतु म्हणजे महाविद्यालयातील प्राध्यापक, विचारवंताचे वैचारिक लेख, शैक्षणिक कार्ये, विविध उपक्रम, प्रकल्प, प्रशिक्षणार्थीनींनी मिळविलेले विविध स्पर्धेतील यश, तसेच महाविद्यालयामार्फत घेतलेल्या स्पर्धा, वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या बातम्या, प्रशासकीय पूर्तता, इत्यादी बातमींचा समावेश करण्यात आला आहे.

कु. सायली पाटील हिने शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत ७ वा क्रमांकावर यश संपादन करुन महाविद्यालयाच्या नावलौकीकात भर घातली आहे.

या २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे आदर्श माता पुरस्कार महाविद्यालयामा मार्फत चालू करण्यात आला. या पुरस्कारच्या पहिल्या मानकरी सौ. माधुरी जगन्नाथ पाटील यांना जाहीर करण्यात आला आहे. अशा विविध चांगल्या घटनेची प्रसिध्दी देवून शिक्षक व विद्यार्थ्यांना प्रात्सोहित करण्यासाठी सदर स्नेहकुंज अंक प्रकाशित करीत आहोत.

## सौ. माधुरी जगन्नाथ पाटील यांना संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे आदर्श माता प्रथम पुरस्कार जाहीर



तासगाव : येथील संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पासून आदर्श माता पुरस्कार देण्याचे जाहीर करण्यात आलेले आहे. या महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थीनींच्या मातेस हा पुरस्कार देण्यात येतो. समाजासाठी कार्य करणाऱ्या तसेच आपल्या वर्तनातून समाजाला ऊर्जा देणाऱ्या मातेला पुरस्कार दिला जाणार आहे. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील हे अध्यक्ष असलेल्या पुरस्कार समितीचे गठन करण्यात आले होते. त्या पुरस्कार निवड समितीने आटपाडी येथील सौ. माधुरी जगन्नाथ पाटील यांची संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे आदर्श माता प्रथम पुरस्कारासाठी एकमताने निवड केलेली आहे. सौ. माधुरी जगन्नाथ पाटील यांनी लग्नानंतर आपले उच्च शिक्षण पूर्ण केले. त्यांनी आपल्या मुलालाही उच्च शिक्षण दिलेले आहे. त्यांच्या दोन्ही मुली उच्चशिक्षित आहेत. सौ. तेजश्री पवार व सौ. प्राजक्ता घोडके यांनी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय तासगाव येथे बी. एड. चे प्रशिक्षण घेतलेले आहे व दोन्हीही शिक्षिका आहेत. त्यांची मुलगी सौ. प्राजक्ता अजित घोडके यांचा शिवाजी विद्यापीठाच्या बी. एड. परीक्षेत नववा क्रमांक आलेला आहे. त्यांनी महाविद्यालयाच्या नावलौकिकत भर घातलेली आहे. पुरस्काराचे स्वरूप मानचिन्ह व सन्मानपत्र

पान नं. २ वर

## उष:कालाची वेळ आली, साहेबांची भेट झाली.



**प्रा. जी. के. पाटील, तासगांव**

बापूजी संस्थामाता थोर
सह्याद्री वरील केले उपकार
तुमच्या कीर्तीचा सुगंध
हाची आमचा मृदंग
साहेबा हाती येता वीणा
गुरु,ध्यास करी झाला ज्ञाना
वॅळकरी यांनी गातो गाणा
हॅपी बर्थ डे... म्हणाना

प्रतिकूलतेचा सूर्य आयुष्यभर नजरेआड करणाऱ्या पाटण खोऱ्यातल्या सुभेदार ज्ञानजीराव साळुंखे घराण्यात जन्मलेल्या बापूजींनी वार लावून जेवताना संघर्ष पायदळी कसा तुडवावा आणि उत्कर्ष छाताडावरती कसा मिळवावा, हे मिळालेल्या प्रत्येक संधीतून सिद्ध केले. विद्याग्रहण करताना इस्लामपूरला शिक्षणप्रसार,सोंडुरला इतिहास लेखक राजगुरू, तर १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात प्रतिसरकारचा भूमिगत स्वातंत्र्य सैनिक आणि स्वातंत्र्योत्तर काळात सह्याद्रीच्या वाऱ्याला साद घालणारा ज्ञानप्रसार. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक ४०७ सांस्कृतिक केंद्रांच्या माध्यमातून अज्ञानाला फोडण्याचे सामर्थ्य देणाऱ्या ज्ञानाला स्वीकारण्यासाठी, उपेक्षितांचे अंतरंग बदलण्यासाठी गुरुदेव कार्यकर्त्यांची फळी उभा करणारा ज्ञानमहर्षी ८ ऑगस्ट १९८७ ला आपल्या हाती त्यांच्याच ताकदीचा सामर्थ्यशाली वाण्याचा, त्यागाच्या वाटेने चालणारा, पुत्र संस्थेचे नेतृत्व म्हणून स्वीकारा असा कल्याणानंदाचा संदेश देऊन ईश्वराच्या हाकेला साथ घालीत, परमेश्वराशी लीन झाले. लीनतेचा कलश अभयकुमारांच्या रूपातून आपणास गुणवत्तेच्या नवा वाटा शोधण्यासाठी देऊन गेले.

साहेबांचा १९७० ला प्राध्यापक म्हणून संस्थेत झालेल्या प्रवेश, मराठी अध्यापन करतानाच मिळालेली विद्यार्थीप्रियता आणि प्राचार्य म्हणून तुळजापूर, तळमावले येथे उत्कृष्ट काम करताना, जतला सायन्स कॉलेज सुरू करताना मिळालेला लोकप्रतिसाद आणि लोकधन बापूजींच्या रूपात जपताना त्यांना मिळालेले यश, मिळालेली संस्थासचिव ते अध्यक्ष, कार्याध्यक्ष अशा विविध पदांची संधी. त्यातून त्यांचे उदयास आलेले नेतृत्व म्हणजे संस्थेचे रूपांतर आनंदवनात करणारे कर्तृत्व.

साहेब १९८५ ला संस्थेचे सचिव झाले.त्यांच्या एका सहीने माझे आयुष्य विवेकानंद संस्थेची जन्मोजन्मीच्या ऋणांनी जोडले गेले. त्यांच्या वाणीतील बापूजींचे सामर्थ्य, बापूजींच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी आयुष्यभर अंगीकारलेले त्यागाचे तत्व मला, संस्थेतल्या गुरुदेव कार्यकर्त्यांना आयुष्यभर उभारी देणारे ठरले. एका महाराष्ट्रातील मोठ्या संस्थेचा मोठेपणा प्राप्त झालेला, मोठेपणा जपण्यासाठी बापूजींच्या विचारांची रुजवण करण्यासाठी आयुष्य खर्ची करणारा हा ज्ञानयोगी माझ्या जीवनाचा शिल्पकार ठरला. प्रेम किती द्यावे आणि प्रेम किती घेत आहे हे आम्हां दोघांकडून शिकावे. इतके प्रेम त्यांनी आम्हास दिले. नोकरी करताना आयुष्यात अडचण सांगण्यासाठी एकही संधी त्यांनी दिली नाही. योग्य वेळी मला हवी ती बदली दिली.माझ्या लेखणी, वाणीला सामर्थ्य दिले. माझ्या संस्था भक्तीला आशीर्वादाने चैतन्याच्या डोहात डुंबत ठेवले.

साहेबांच्या कडे कोणताही गुरुदेव कार्यकर्ता आला की, तो का आला आहे, त्याच्या येण्यात स्वार्थ आहे की त्याग. समोरच्या व्यक्तीचा चेहरा पाहून ते ओळखत, निर्णय घेत. एवढी मोठी संस्था चालवताना जनाधार प्रचंड असतांनाही अनेकांनी सत्तेसाठी उपद्रव दिला. स्वार्थासाठी निष्करण बदनामीचे तंत्र वापरले पण त्यांच्या आचरणांचा मंत्र इतका शुद्ध होता की, आसूड नावाची वैफल्यग्रस्ततेतून येणारी वर्तनातील परिवर्तने त्यांच्या निर्णयात कधीच दिसली नाहीत. आज संस्था प्रशासनाला गेली ४० वर्षे आलेले स्थैर्य,समाज आणि शासन दरबारात मिळालेली सन्मानता आणि गुणवत्तेचा सातत्यशील संस्थेलाच मिळत असलेला शिरपेच ही साहेबांच्या कुशल नेतृत्वाची यशोगाथा होय. अशा एका कर्तृत्वशाली कुटुंब संवर्धक, बापूजींच्या बिनीच्या सरदारास आम्हा हीत संवर्धक वरदायिणीस वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना माझ्या लेखणी कंठातून शब्द उतरतात...

देव माणसातला माणूस
घेई दुःखाचा कानोसा
आनंदमळा फुलवीत...
चैतन्याने आम्हा डोलवीत
हाके बापूजींचा ज्ञानगाडा
वाढदिवसाला देतो आम्ही तुम्हा पेढा.

## ज्ञानतपस्वी प्राचार्य अभयकुमार साळुंखे



**प्रा. डॉ. ए. टी. पाटील**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक संस्थापक परमपूज्य शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी महाराष्ट्रातील गोरगरीब कष्टकरी सामान्य जनतेच्या हितासाठी शिक्षण संस्थेची उभारणी केली. शिक्षणाचे पवित्र कार्य करत असताना अतिशय कष्टपूर्वक आणि उच्च ध्येयाने प्रेरित होऊन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना बापूजींनी केली. भारतातील शिक्षण संस्थांचा अभ्यास केल्यानंतर आपणाला असे दिसून येते की, भारतामध्ये अनेक शिक्षण तज्ञांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा गौरव पूर्ण उल्लेख केलेला आहे. त्या पाठीमागे बापूजींचे शैक्षणिक विचार, प्रामाणिकपणे कार्य करण्याची कमालीची उच्च नीतिमत्ता, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था म्हणजेच माझी कुंटुंब आणि त्या कुंटुंबातील प्रत्येक व्यक्तीने शिक्षण घेऊन देशाचा आदर्श नागरिक बनावे ही भावना शिक्षण महर्षी बापूजी यांच्याकडे होती.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या कार्याचा आणि विद्यार्थ्यांच्या दृष्टीने उत्साहाचा भाग म्हणजे स्वामी विवेकानंद यांची जयंती. ही जयंती विवेकानंद जयंती सप्ताह म्हणून संस्थेमध्ये साजरी केली जाते. याच कालखंडामध्ये १७ जानेवारी ही तारीख संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे साहेब यांचा वाढदिवस म्हणून गुरुदेव कार्यकर्ते साजरा करण्याचे निश्चित करतात. परंतु साहेबांना ते कधीही तितकेसे रुचत नाही. संस्थेत १७ जानेवारी हा दिवस ज्ञानशिदोरी म्हणून साजरा केला जातो. या अंतर्गत विविध उपक्रम प्रत्येक शाखेवर राबवले जातात. ७५ वर्ष साहेबांना पूर्ण झाल्यानंतर साहेबांनी गुरुदेव कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव अमृत महोत्सवी वाढदिवस साजरा केला. त्यामध्ये साहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू माझ्यासारख्या गुरुदेव कार्यकर्त्याला पाहायला मिळाले. कविवर्य गोविंदाग्रजांच्या शब्दांमध्ये सांगायचे तर, 'राकट देशा, कणखर देशा,दंगडांच्या देशा, नाजुक देशा, कोमल देशा फुलांच्याही देशा' असा हा छत्रपती शिवाजी महाराजांचा, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचा, आणि संत तुकाराम महाराजांच्या भाषेत भले तर 'देऊ कासेची लंगोटी नाठाळाच्या माथी मारू काठी' असा महाराष्ट्र आणि त्यामधील आमचे रांगडे व्यक्तिमत्त्व म्हणजे आमचे साहेब.

एखाद्या सुप्रसिद्ध कुंटुंबकर्त्याच्या पोटी जन्माला येणे हे जसे त्या व्यक्तीचे भाग्य असते तसेच कुंटुंबकर्त्यांनी केलेले कार्य टिकवून ठेवणे हे सुद्धा त्याचे कर्तव्य असते. हे जाणून प्राचार्य अभयकुमार साळुंखे साहेब यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या वाटचालीमध्ये शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी उभारलेल्या वटवृक्षाला कायमस्वरूपी विस्तारण्यासाठी त्याची मुळे जमिनीत घट्ट टिकवून धरण्यासाठी जे कष्ट सोसावे लागले ते शांत आणि संयमी अंतःकरणाने सोसले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची प्रार्थना आहे त्यामध्ये सत्य, शील प्रामाणिकता त्याग पिळवणुकीस आळा, मानवाचे अधिष्ठान इशतत्त्व दर्शन, हे शब्द अतिशय प्रामाणिकपणे आणि त्याग पूर्ण भावनेने जगलेले व्यक्तिमत्व म्हणजे आदरणीय प्राचार्य अभयकुमार साळुंखे साहेब. कुंटुंबातुन मिळालेले संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे आणि बापूजी साळुंखे यांचे संस्कार सरांनी कधीही विसरले नाहीत. त्यामुळेच संस्थेचे शतक महोत्सव वर्ष साजरे होऊ शकले. साहेब ज्या ज्या वेळेस शाखेला भेट देतात त्या त्यावेळी प्रत्येक गुरुदेव कार्यकर्ता आणि सेवक वर्ग सुरुवातीला साहेब येण्यापूर्वी थोडासा दडपणात असतो पण जेव्हा साहेब समोर येतात आणि शाखेची माहिती घ्यायला लागतात त्यावेळी आपल्या घरातीलच ज्येष्ठ व्यक्ती बोलत आहे असे वाटायला लागते आणि कार्याध्यक्ष असलेल्या साहेबांच्या पुढेही सर्व गुरुदेव कार्यकर्ते शाखेच्या विस्तारासाठी विद्यार्थ्यांसाठी, प्रामाणिकपणे आपल्या भावना व्यक्त करतात. माझ्या महाविद्यालयामध्ये ज्यावेळेला साहेब दोन-तीन वेळा आले आणि

पान नं. २ वर

# ज्ञानसंरचनावाद आणि शिक्षकांची बदलती कार्ये

**डॉ. अर्चना चिखलीकर**



गेल्या दोन दशकांमध्ये शिक्षणविषयक विचारांत मोठे परिवर्तन झाले आहे. या विचार परिवर्तनाला शास्त्रीय संशोधनाचा आधार आहे. या बदलते शिक्षण नव्या सैद्धांतिक पायावर आता शिक्षणाच्या व्यवहारांची नवी इमारत उभी राहत आहे. भारतात २०५ च्या राष्ट्रीय शिक्षणक्रम मसुद्याने आणि ९ एप्रिल २००८ च्या बालकाच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण कायद्याने तसेच केंद्राच्याच धर्तीवर महाराष्ट्र सरकारने केलेल्या २०१० च्या नवीन शिक्षणक्रमाचे हे आव्हान आपण स्विकारले आहे.

शिक्षणाच्या ज्या नव्या शिक्षणप्रणालीचा स्वीकार करायचा करावयाचा आहे त्यास ज्ञानरचनावाद किंवा रचनावाद असे संबोधण्यात येते. स्वीस मानसशास्त्र जीन पियाजे आणि रशियन मानसशास्त्रज्ञ वायगोटस्की यांच्या संशोधन उपपत्तीने ज्ञानरचनावादास आकार दिला आहे. याच सुमारास कृत्रिम बुद्धिमत्तेच्या शास्त्राने सर्व क्रियांचे मानवी मेंदूशी– मेंदूतील माहिती प्रक्रियेशी साम्य दर्शवून माणसाच्या मेंदूचीच उकल करण्याची किल्ली हाती आली. शिक्षणाचा, म्हणजे विद्यार्थ्यांच्या शिकण्याचा. जो काही व्यवहार शालेय वर्गामधून अस्तित्वात येतो, त्यांचा संबंध मुख्यत्वेकरून शिकण्याचे उदिष्ट, शिकण्याचा आशय, आशयाचा संदर्भ आणि विद्यार्थ्यांची कृती या चार घटकांशी असतो. रचनावादी शिक्षणाची व्यावहारिक तत्त्वे रचनावादी शिक्षण हे मूलतः विद्यार्थी केंद्री शिक्षण असते. रचनावादी शिक्षणाची शिक्षण व्यवहाराला दिशा देणारी अशी तत्वे पुढीलप्रमाणे १. स्वयं–अध्ययनाचे तत्त्व, २. स्वानुभव तत्त्व, ३. स्वरचित अर्थपूर्णतेचे तत्त्व, ४. आव्हान तत्त्व, ५. परिपूर्ती तत्त्व.

योगी अरविंदांच्या मते 'Nothing can be Taught' हे अध्यापनाचे महत्त्वाचे तत्त्व आहे. कोणतीच गोष्ट दुसऱ्याला शिकविता येणार नाही, ज्याचे त्यालाच शिकावे लागणार आहे. शिक्षकाला फक्त त्याच्या शिकण्यास मदत करता येईल म्हणूनच शिक्षकाच्या कार्याचे स्वरूप बदलले पाहिजे ज्ञानरचनावादी शिक्षकाची बदललेली कार्य रचनावादी पद्धतीच्या वर्गशिक्ष शिक्षकाला अध्यापनाचे काम फारसे नसते पण त्याऐवजी काय करायचे हे त्याला समजावे लागते. ते तसे का करायचे हे ही त्याला समजून घ्यावे लागते. साचेबद्ध शिक्षण व्यवहाराच्या चौकटीतून बाहेर पडण्याचे धैर्य त्याला दाखवावे लागते. नव्या पद्धतीच्या शिक्षणासाठी त्याला आपल्या पूर्वीच्या वृत्ती प्रवृत्ती, श्रद्धा, विश्वाय सोयी यामध्ये बदल करण्याचे आव्हान स्विकारावे लागते.

ज्ञानरचनावादास पूरक अध्यापन पद्धतीचा स्वीकार:

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा NCF(२००५) नुसार ज्ञानरचनावाद हा अभ्यासक्रमाचा पाया आहे असे दिसून येते व त्यावरच आधारित अभ्यासक्रमाची रचना केलेली आहे. अग्रत संघटक प्रतिमान, संकल्पनाप्राप्ती प्रतिमान, संकल्पना आरेखन इ. ज्ञानरचनावादास पूरक अध्ययन अध्यापन पद्धती आहे. वर्गात या पद्धतीचा वापर अध्यापकांनी करणे अनिवार्य आहे. परंतु आजही बहुतांशी वर्गाध्यापनात पारंपरिक अध्यापन पद्धतीचा वापर केला जातो. असे न करता अध्यापकांनी ज्ञानरचनावादास पूरक अध्ययन अध्यापन पद्धती स्वीकारणे आवश्यक आहे.

**१) सुविधा पुरवणे** : पारंपरिक वर्गाध्यापनापेक्षा ज्ञानरचनावादी वर्गाध्यामध्ये शिक्षकांना विविध सुविधा पुरवण्याची जबाबदारी अधिक असते. शिक्षकांनी Facilitator बनणे ही आजच्या वर्गाध्यापनाची गरज आहे. आवश्यक शैक्षणिक साधनांची उपलब्धता करून देणे तसेच अग्रत संघटकांचे सादरीकरण करून त्यामधील वैशिष्ट्ये विद्यार्थ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी विविध क्लृप्त्या व तंत्रे शिक्षकांना वापरावी लागतात. चित्रे, नकाशे, स्लाईड शोच्या माध्यमातून ज्ञानरचनावादी वर्गाध्यापन शिक्षकांना करावे लागते. याकरिता आवश्यक सुविधा वर्गात पुरवणे आवश्यक असते.

**२) पूर्वज्ञान जागृती :** ज्ञानरचनावादी अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत विद्यार्थ्यांच्या पूर्वज्ञानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पूर्वज्ञानाशी सांगड घालून नव्या ज्ञानाचे अध्यापन केले तर विद्यार्थ्यांच्या स्मरणात असे ज्ञान दीर्घकाल टिकते व संकल्पना लवकर आत्मसात व्हायला मदत होते आणि अशा प्रकारे झालेले अध्ययन अर्थपूर्ण होते. विद्यार्थी अशा अध्ययन–अध्यापन पद्धतीत क्रियाशील राहतात. म्हणून शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या पूर्वज्ञानावर अधिक भर देणे आवश्यक आहे.

**३) प्रेरक व मार्गदर्शक :** अध्ययन अध्यापन पद्धतीमध्ये प्रेरणेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या प्रकारच्या अध्ययन अध्यापन पद्धतीमध्ये विद्यार्थी सतत क्रियाशील असतो. उदा. संकल्पना आरेखन या तंत्रात विद्यार्थी स्वतः संकल्पनाचे आरेखन करून त्या संकल्पना आत्मसात करण्याचा प्रयत्न करत असतो. येथे शिक्षकांनी योग्यवेळी विद्यार्थ्यांना आवश्यक प्रेरणा व मार्गदर्शन करणे गरजेचे असते.

**४) अर्थपूर्ण अध्ययनाचा भोक्ता :** अर्थपूर्ण अध्ययन म्हणजे पूर्वज्ञानाशी नव्या ज्ञानाची सांगड घालून विद्यार्थ्यांच्या बोधात्मक संरचनेत चपखलपणे बसवलेले ज्ञान होय, असे ज्ञान विद्यार्थ्याच्या चिरकाल स्मरणात राहते. अर्थपूर्ण अध्ययन हा ज्ञानरचनावादाचा पाया आहे म्हणून शिक्षकांनी वर्गाध्यापन करताना अर्थपूर्ण अध्ययनाला केंद्रस्थानी ठेवले पाहिजे की, जेणेकरून विद्याथ्र्यांचे विशिष्ट घटकासंदर्भातील अध्ययन अर्थपूर्ण होईल.

**५) विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचा स्वीकार :**

National Curriculum framework (२००५) मध्ये विद्यार्थ्याला 'Knowledge Creator' म्हटले आहे. त्याप्रमाणे ज्ञानरचनावादी वर्गात विद्यार्थी स्वतः पूर्वज्ञानाचा वापर करून नवीन ज्ञान आत्मसात करत असतो. यामध्ये विद्यार्थी स्वतःच्या सृजनशीलतेचा वापर करतो. उदा. संकल्पना आरेखन या तंत्रात 'प्राचीनकालीन मानवी जीवन' या संकल्पनेचे चित्रण करताना विद्यार्थी आपल्या सृजनशीलतेच्या आधारे विविध प्रकारे चित्रण करू शकतो व त्याचे संकल्पना आरेखन रेखाटतो. म्हणून शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला चालना देऊन तिचा स्वीकार करणे अनिवार्य ठरते.

**६) सहकार्य वृत्ती निर्माता :** ज्ञानरचनावादी पूरक अध्ययन अध्यापन पद्धतीमध्ये बऱ्याचदा विद्यार्थ्यांची गटविभागणी करावी लागते व विद्यार्थी परस्परांना सहकार्य करून अध्ययन करत असतात. उदा. Collaborative approach, Blended learning या तंत्रात विद्यार्थ्यांना संघटित होऊन अध्ययन करावे लागते. तसेच Concept mapping मध्ये विद्यार्थ्यांचे गट करून विविध संकल्पनाचे आरेखन प्रत्येक गटाकडून करून घेतले जाते. अशा प्रकारच्या अध्ययनात विद्यार्थ्यांचे परस्परांना सहकार्य असणे आवश्यक असते. म्हणून शिक्षकांनी विद्यार्थ्यात सहकार्य वृत्ती निर्माण करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत.

अशा प्रकारे शिक्षकांना ज्ञानरचनावादी वर्गाध्यापन प्रक्रियेत विविध भूमिका पार पाडाव्या लागतात. ज्ञानरचनावादी वर्गाध्यापन पद्धतींचा स्वीकार करून त्याद्वारे अध्यापन करणे ही सध्याच्या काळाची गरज बनली आहे. कारण National Curriculum Framework (२००५) चा पाया 'ज्ञानरचनावाद' आहे. तो सक्षम करण्यासाठी अध्यापकांची वर्गाध्यापनातील भूमिका महत्त्वाची ठरते

# भारतीय संस्कृतीतील विज्ञान

**- डॉ. लक्ष्मी भंडारे**



परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. मानवाने प्राचीन काळामध्ये चाकाचा शोध लावला आणि हळूहळू मानवाच्या प्रगतीची चाके फिरू लागली. विज्ञान तंत्रज्ञानानेएवढी मोठी प्रगती केली. प्राचीन काळामध्ये आपल्या पूर्वजांनी कल्पनासुद्धा केली नसेल एवढी प्रगती आपण विज्ञान तंत्रज्ञानाच्या जोरावर केली आहे. विज्ञान हे मानव जीवनाला लाभलेले वरदानच आहे. आपण एवढी सगळी प्रगती केली ती विज्ञानामुळे आमचे वैज्ञानिक रोज वेगवेगळ्या प्रकारच्या गोष्टीचे संशोधन करून त्यांच्यातून निष्कर्ष बाहेर काढून एका नवीन गोष्टीचा शोध लावतात. या तंत्रज्ञानाच्या विकासामुळे आपला आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकासामुळे आपला विकास होत आहे. हा विकास अपेक्षितापर्यंत पोहचवण्याचे काम विज्ञान करते. विज्ञानामुळे प्रत्येक मनुष्याला जीवनाला नवीन संजीवनी प्राप्त झाली आहे. विज्ञान व तंत्रज्ञानामुळे समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. आमचा पूर्वीचा संघर्ष हा खाण्यापिण्यासाठी होता. आपल्याला रानोमाळ भटकावे लागत असे पण विज्ञानामुळे कृषी क्षेत्रामध्ये प्रगती होऊन मानवाच्या मूलभूत गरजा अन्न, वस्त्र, व निवारा हयापूर्ण झाल्या. विज्ञान हे मानवी जातीच्या विकासाचे साधन मानले जाते. कारण आमचा प्रवास हा चाकाच्या शोधापासून ते हवेत उडणाऱ्या विमानापर्यंत आहे. विज्ञानामुळेच आम्ही निल आर्मस्ट्राँगला चंद्रावर पाठवू शकलो. विज्ञानामुळे दळण–वळण, व्यापार, वीज, रेल्वे यासारख्या असंख्य गोष्टीचा शोध लागला विज्ञान हे मानवी जीवनाशिवाय पूर्ण होत नाही, तर मानवाचे जीवन हे संपूर्णतः विज्ञानावर अवलंबून आहे. वेगवेगळ्या आपत्ती, आजार, आपल्या समाजामध्ये आले तर त्यांच्यावर मातही आपण विज्ञानाच्या साहय्याने करतो. मानवी जीवनाचा अविभाज्य घटक म्हणून विज्ञानाकडे पाहिले जाते. विज्ञानाच्या जोरावरच आपण विकासाच्या प्रगतीची पताका आपल्या खांद्यावर घेऊ शकतो, हे विज्ञानाने सिध्द करून दाखवेले आहे. मानवाला आपली प्रगती ही विज्ञानाशिवाय करता येत नाही आपल्या दररोजच्या जीवनामध्ये विज्ञानाने केलेल्या प्रगतीच्या शोधाचा आपल्याला फयदा होतो. पूर्वीच्या काळामध्ये आपण गारगोटी प्रकारची दगडे एकमेकावर घासून आग निर्माण करत होतो. पण आज विज्ञानामुळे आगपेटीचा शोध लागला आहे. विज्ञानामध्ये फार मोठ्या प्रमाणात सामर्थ्य आहे मानवाच्या गरजा भागविण्याची ताकद विज्ञानामध्ये आहे विज्ञान हा मानवी जीवनाला सापडलेला परीस आहे या परिसाच्या स्पर्शाने मानवाचे जीवन सुवर्णमय झाले आहे. विज्ञानामुळे मानवाच्या जीवनामध्ये आमूलाग्र बदल होत गेलें प्राचीन काळातीत माणूस व आजचा माणूस याच्यातील फरक पाहिला तर माणूस हा विज्ञानामुळे गतिमान बनला आहे मानवाची गती ही चढत्या आलेखाप्रमाणे वाढतच राहणार जोपर्यंत मानवाच्या जोडीला विज्ञान आहे, तोपर्यंत विकासाचे दरवाजे मानवी समाजासाठी खुले राहणार आहेत. दूरदर्शन, रेडिओ, संगणक गॅस, मिक्सर हे सर्व आमच्या घरामध्ये आले. पूर्वी आम्हाला एका गावाकडे जाण्यासाठी २० किलोमीटर अंतरासाठी तास लागायचे पण आज तेज अंतर कापण्यासाठी २० मिनिटे लागतात. यंत्रांच्या साहय्याने कमी वेळात एक व्यक्ती काम करते. विज्ञानाने अनेक गोष्टी मानवाला दिल्या पण या विज्ञानाचा वापर करणाऱ्या मानवाच्या कृतीवर विवेकशील नियंत्रण न राहिल्यास जगाचा संहार अटळ आहे कारण काडीपेटींनी ही समई लावता येते आणि एखाद्याचे घरी ही जाळता येते म्हणून केवळ विज्ञान युक्त प्रगती ही देशाला घातक ठरू शकते. म्हणून संस्कृतीतील वैज्ञानिक दृष्टी महत्त्वाची ठरते.

आमची खरी संस्कृती शेजाऱ्याचे दुःख जाणने, त्याचे काम ते आपले काम ते काम पूर्ण होण्यासाठी संघर्ष करण्याची घेतलेली काम पूर्ण होईपर्यंत त्याच्या पाठीमागे धावणाच्या माणसांना खरी संस्कृती माहीत होती. पण आज आम्हाला आमच्या संस्कृतीचा कुठेतरी विसर पडत चालला आहे. असं वाटतं आहे आज चारही बाजूंना आक्रमण करणारी पाश्चिमात्य संस्कृती पाहिलं की हजारो वर्षापासून ज्या भारतीय संस्कृतीने आम्हांला चांगले धडे दिले. आम्हाला कसं वागाव, बोलावं शिकवण्याच काम केलं थोरल्या भावाचा, बहिणीचा आईचा आदर ठेवावा गुरुवर्य ध्येयासाठी प्रेरित होणारी युवापिढी आज कुठे आहे ? असा प्रश्न पडतो.

आम्ही पाश्चिमात्य संस्कृतीत एवढे गुरफटलो आहोत की आम्ही आमचा पोशाख बदलतोय पण त्याचबरोबर मनाच्या भावना, चेहरा बदलला, फॅशनच्या जमान्यामध्ये मुखवट्या वरती वेगवेगळी सौंदर्य प्रसाधने लावून नैसर्गिक सौंदर्यच घालवले आहे .आम्ही विदेशी संस्कृतीच्या एवढे आहारी गेलो आहोत की भारतीय संस्कृतीचे अस्तित्वच विसरलो आहोत. पाश्चिमात्य संस्कृतीच्या आक्रमणामुळे आपल्यातील 'स्व' व 'मी' ही नाहीशी होत चालली आहे ती जागी करणे गरजेचे आहे. प्रसारमाध्यमे खुलेआम धोरण उघड्या डोळ्यांनी पाहण्याची सवय, विदेशी संस्कृती मध्ये काही तरी नावीन्य आहे असे मानून त्याच्या पाठीमागे धावणारी आजची युवापिढी पहायला मिळते.

आपली संस्कृती, आचार, विचार, कर्तृत्व, नेतृत्व निष्ठा, भक्ती, त्याग, सौदर्य, नम्रता, आदर, आदर्श कृतज्ञता, प्रामाणिकपणे अशी आहे. कोणाला स्वीकारल्याचे व कोणाचा त्याग करायचा हे आपणच ठरवायचे आहे. एकदंरीत विज्ञानाशिवाय मानवी जीवन अपुरे आहे. त्यासाठी आपण विज्ञानाची साथ धरली पाहिजे. आणि देशाच्या प्रगतीची फुले सर्व जनमानसांत पसरवली पाहिजेत, तरच त्या फुलाचा सुंगध आपणाला मोहरून टाकेल.

संस्कृती म्हटले की, आपल्या राष्ट्राची परंपरा संस्कार, पौराणिक संदर्भ आपल्या संस्कृतीचे घडे शिकवले जात होते, ज्या भूमीमध्ये आम्हाला आमची भारतीय संस्कृती किती महान आहे, हे पटवून दिले जात होते त्या संस्कृतीचे संवर्धन पालनपोषण, संस्कृतीच्या संस्काराचे आदर्श घेऊन वाटचाल करणारी माणसं आपल्या समाजामध्ये होती, पण आज प्रसारमाध्यांमाचे अतिक्रमण व जागतिकीकरणाच्या खुल्या धोरणामध्ये कोणतीही संस्कृती येते व त्या संस्कृतीचा धिंगाणा आपल्या समोर उभा राहतो. नकळत अस्वस्थ मनासमोर प्रश्न पडतो पाश्चिमात्य संस्कृतीच्या विळख्यात भारतीय संस्कृती किती अडकली आहे.

इतिहासातील आपल्या संस्कृतीबाबत असंख्य संदर्भ पहायला मिळतात 'भूक असताना खाणे ही प्रकृती भूक नसताना खाणे ही विकृती, भूक असतानाही आपल्यातला घास दुसऱ्याला देणे ही आपली भारतीय संस्कृती' असे बरेचसे संदर्भ आपल्याला संस्कृतीची माहिती सांगणारे पहायला मिळतात. संस्कृती हा शब्द तसा लहानसा आहे असं वाटतं, पण या वाक्यात बऱ्याच गोष्टीचा अर्थ लपलेला पहावयास मिळतो. प्रत्येक राष्ट्राची ओळख ही त्या राष्ट्राची संस्कृती, परंपरेवर होत असते आपल्या देशाला प्राचीन संस्कृतीचा ठेवा आहे संस्काराचे विचारपीठ, आदर्शाचे प्रेरणास्थान म्हणून संस्कृतीकडे पाहिले जाते. आज तुम्ही नुसतं ज्ञानी असून चालणार नाही, गुणी असून चालणार नाही तर तुम्ही सद्गुणी हवे सुसंस्कारित हवे आणि असेच सुसंस्कारित ज्ञान असलेली व्यक्ती विज्ञानाचा वापर मानवाच्या कल्याणासाठी करू शकतो म्हणून आजच्या काळात संस्कृतीशील विज्ञानाची आवश्यकता आहे असे मला वाटते.

## सौ. माधुरी जगन्नाथ पाटील यांना संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे आदर्शमाता प्रथम पुरस्कार जाहीर

पान १ वरुन

तसेच पैठणी साडी असे आहे. अशा कुटुंब वत्सल व समाजासाठी आदर्श असणाऱ्या सौ. माधुरी जगन्नाथ पाटील यांना महाविद्यालयार्ते सदरहू पुरस्कार देताना आनंद होत आहे. असे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील यांनी सांगितले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मा. कार्याध्यक्षसाहेब अभयकुमारजी साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे मॅडम, मा. कौस्तुभ गावडे तसेच प्रशासन सहसचिव प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ आणि अर्थसचिव श्री. गवळी सर यांनी सौ. माधुरी जगन्नाथ पाटील यांचे अभिनंदन केले आहे.

पान नं. १ वरुन

## ज्ञानतपस्वी प्राचार्य अभयकुमार साळुंखे

आम्हा गुरुदेव कार्यकर्त्यांना बोलताना एक वाक्य बोलून गेले ही शाखा म्हणजे माझ्या आईचे स्मारक आहे त्यासाठी तुम्ही कोणतीही मागणी केली तरी मी नामंजूर करणार नाही. पण तुम्ही मुलींच्या शिक्षणासाठी सातत्याने प्रयत्न केला पाहिजे. तासगाव मध्ये आल्यानंतर श्री रामानंद भारती विद्या मंदिर असो की पद्मभूषण डॉक्टर वसंतदादा पाटील महाविद्यालय असो या शाखांना भेट देत असतानाच आमच्याही महाविद्यालयात साहेबांनी वेळोवेळी वेळ काढून भेट दिली. शाखेच्या विस्तारित इमारतीच्या बांधकामाच्या वेळी साहेब ज्यावेळेला महाविद्यालयात आले तेव्हा तासगाव मधील सेवानिवृत्त अजून सेवकांचेही मार्गदर्शन घेत चला कारण संस्था विकासामध्ये बापूजींना मोलाचे साथ देणारे गुरुदेव कार्यकर्ते या शहरांमध्ये आहेत असे साहेब आम्हाला नेहमी सांगत यातून प्रत्येक आजिव सेवकाबद्दल असलेला आदर त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो.

प्रशिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या कमी असते म्हणून कधीही, कोणत्याही मागणीकडे त्यांनी दुर्लक्ष केले नाही. त्याग आणि समर्पण वृत्तीने कार्य करणे हे आपले कर्तव्य आहे. अशी शिकवण बापूजींची होती, संस्थामातांची होती. तशाच प्रकारच्या मुली आपल्या शाखेतून निर्माण करा असे भावपूर्ण उदगार साहेबांनी आमच्या समोर स्नेहकुंज अंकाच्या प्रथम प्रकाशनाच्या काढलेले आम्हा गुरुदेव कार्यकर्त्यांना आठवतात. आजची शिक्षण व्यवस्था टिकून आहे त्यामागे समाजातील कष्टकरी गोरगरीब जनतेचे आशीर्वाद, आपल्या पाठीमागे आहेत हे कधीही विसरू नका असे विचार साहेबांच्या बोलण्यातून नेहमी येतात. हे विचार म्हणजेच बापूजींची स्वरचित प्रार्थना होय असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. अशा या उत्तुंग व्यक्तिमत्वाला त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी मी अंतकरण पूर्वक हार्दिक शुभेच्छा देतो आणि विठ्ठलाच्या चरणी शतायुषी होवो अशी प्रार्थना करतो.

## मतदान करणे म्हणजे लोकशाही बळकट करणे -प्रा. डॉ. एम. एस. उभाळे



तासगाव- भारत निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी झाल्याने हा दिवस राष्ट्रीय मतदार दिन म्हणून संपूर्ण देशभर साजरा केला जातो. देशाच्या हितासाठी आणि विकासासाठी तसेच लोकशाहीला बळकट करण्यासाठी देशातील सर्व पात्र मतदारांनी विवेकाने मतदानाचा हक्क बजवावा. नवमतदारांमध्ये जाणीव जागृती करण्यासाठी व मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी राष्ट्रीय मतदार दिन दरवर्षी साजरा करण्यात येतो. असे प्रा. डॉ. एम. एस. उभाळे यांनी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित केलेल्या ऑनलाईन कार्यक्रमात प्रशिक्षणार्थीना मार्गदर्शन केले.

तासगाव येथील संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. शितल पाटील यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश व रूपरेषा स्पष्ट केली. जास्मिन मुलानी, पूजा जाधव व धनश्री कचरे यांनी दैनंदिन परिपाठ सादर केला. राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत प्रथम तीन आलेल्या राजनंदा शिंदे, कविता माळी आणि पूजा शिंदे यांनी आपल्या निबंधाचे अभिवाचन केले. त्यानंतर प्रा. डॉ. एम. एस. उभाळे यांनी महाविद्यालयीन निवडणूक साक्षरता मंडळाची घोषणा केली. त्यानंतर राष्ट्रीय मतदार प्रतिज्ञा सर्वांकडून वदवून घेतली. त्यानंतर त्यांनी आपले उपरोक्त आपले अध्यक्षीय मनोगताचे सादरीकरण केले. प्रगती कोळी यांनी आभार अभिव्यक्ती तर राजनंदा शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या आयोजनासंबंधी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.बी.एम.पाटील यांनी मार्गदर्शन केले.

## महिला बी. एड. प्रशिक्षणार्थीनींची सैनिकी शाळेस भेट



तासगाव- येथील संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थीनींनी गुरुवर्य दादोजी कोंडदेव सैनिक स्कूल तासगाव येथे शिवाजी विद्यापीठ प्रात्यक्षिक कार्य 'शाळा व नाविन्यपूर्ण नवोपक्रम भेट' अंतर्गत सदिच्छा भेट दिली. त्या वेळी सैनिकी शाळेतील दिनक्रम समजून घेतला. त्यामध्ये प्रार्थना, परिपाठ यापासून सुरुवात केली. त्यानंतर शिक्षक श्री. फौजदार सर यांनी शाळेतील दिनक्रम यांची माहिती दिली. त्याचप्रमाणे तेथील शिक्षक श्री. जोशी यांनी येथील प्रत्येक विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शाळेत कोण कोणते उपक्रम राबवले जातात, याविषयी माहिती दिली. त्यानंतर या सैनिकी शाळेचे स्थापनेपासून ते आजपर्यंतच्या प्रगतीबाबतचा व्हिडीओ दाखवण्यात आला. त्यानंतर प्रशिक्षणार्थीनींनी शाळेतील विविध विभागांना भेटी दिल्या व तेथील कामकाज समजून घेतले. त्यामध्ये वाचनालय, प्रयोगशाळा, संगणक कक्ष, वसतीगृह, खानावळ व क्रीडांगण वरील विविध खेळांची माहिती जाणून घेतली.

समारोपाच्या कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक श्री. शेंडगे यांनी विद्यार्थ्यांना कशाप्रकारे प्रेरित करून एनडीए मध्ये अधिकारी होण्यास सक्षम केले जाते. याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यानंतर कमांडर कर्नल पवार यांनी महिलांसाठी आर्मी, नेव्ही व मिलिटरी मध्ये नोकरीच्या कोणकोणत्या संधी आहेत, याविषयी सविस्तर माहिती दिली. श्री. फौजदार सर, श्री. जोशी सरांनी व शाळेतील इतर सर्व शिक्षकांनी मोलाचे सहकार्य केले. धनश्री कुंभार या प्रशिक्षणार्थीनीने आभार मानले.

## महाविद्यालयात संस्थामाता सुशीला देवी साळुंखे यांचा स्मृतिदिन



तासगाव : येथील संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे... आठवणींना उजाळा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. सर्वप्रथम प्रा.जी.केपाटील यांच्या हस्ते भितीपत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले. प्रास्ताविकेतून प्रतिक्षा घाटगे यांनी कार्यक्रमाचा उद्देश व रुपरेषा स्पष्ट केली. तसेच सुषमा जाधव यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर प्रशिक्षणार्थीनी देशमुख रेश्मा, भोसले राणी आणि चोरमुले अरुणा यांनी संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या विषयी आपली मनोगते सादर केली.

प्रमुख वक्ते प्रा.जी.केपाटील यांनी संस्थामाता सुशीलादेवींच्या जीवनकार्याची माहिती दिली व मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले, जर जीवनामध्ये एक यशस्वी व्यक्ती बनायचे असेल तर संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्यासारखे मोठे मन ठेवा. कधीही कोणता अविचार करू नका.सर्वांबरोबर स्नेहपूर्ण संबंध तयार करा

त्यानंतर डॉ.एल.व्ही. भंडारे यांनी अध्यक्षीय मनोगत सादर केले. सूत्रसंचालन ऐश्वर्या भिसे तर आभार अभिव्यक्ती प्रियंका बिले यांनी केली. कार्यक्रमासाठीची भीतीपत्रिका अजिता गायकवाड व मयूरी भोसले यांनी केली. कार्यक्रमाचे मार्गदर्शन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. बी.एम.पाटील यांनी केले.

## महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांना अभिवादन



तासगाव:- येथील संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.त्यानंतर पूजा पाटील यांनी कार्यक्रमाचा उद्देश व रूपरेषा प्रास्ताविकेतून सांगितला. मेघा चव्हाण यांनी मान्यवरांचे स्वागत केले. भारती भोसले यांनी प्रमुख वक्त्या डॉ. अर्चना चिखलीकर यांचा परिचय करून दिला. त्यानंतर अमृता सदामते,धनश्री माळी,स्नेहल गायकवाड,शारदा माळी व अश्विनी माने या विद्यार्थीनींनी समायोचित मनोगते सांगितली.

त्यानंतर प्रमुख वक्त्या प्रा.डॉ. अर्चना चिखलीकर यांनी सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षमय जीवनाचा परिचय करून दिला. त्यांनी सांगितले की,सावित्रीबाई फुले यांनी २०० वर्षांपूर्वी अतिशय संघर्षातून स्त्रियांचे जीवन समृद्ध करण्यासाठी संपूर्ण आयुष्य कारणी लावले. त्यांनी पहिली मुलींची शाळा काढली, त्या भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका होत्या, त्याच पहिल्या मुख्याध्यापिका होत्या, त्या स्त्री शिक्षण तज्ञ होत्या, सहशिक्षणाच्या पुरस्कर्त्या होत्या, अस्पृश्यांसाठी पाण्याची विहीर त्यांनी खुली केली, विधवा विहाचा पुरस्कार केला, तसेच केशवपन प्रथेला विरोध केला, आणि त्या उत्तम कवयित्री होत्या

त्यानंतर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील यांनी अध्यक्षीय मनोगत सादर केले. सूत्रसंचालन नेहा म्हैत्रे व सायली पवार यांनी केले. तर आभार अभिव्यक्ती कोमल निकम यांनी केली.

## महाविद्यालयातील राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचा निकाल जाहीर

तासगाव- येथील संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात भाषा मंडळातर्फे संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त महाविद्यालयीन राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. या निबंध स्पर्धेचा निकाल महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील यांनी जाहीर केलेला आहे. प्रथम क्रमांकासाठी रु. १००१ व प्रमाणपत्र असे बक्षीस होते. प्रथम क्रमांकासाठी दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स व कॉमर्स महाविद्यालय इचलकरंजी येथील विद्यार्थिनी शुभांगी कपिल कांबळे यांना मिळाला आहे. त्यांच्या निबंधाचा विषय- डॉ. बापूजी साळुंखे यांचे शिक्षणातील योगदान हा होता. द्वितीय क्रमांक साठी रु. ७०१ आणि प्रमाणपत्र असे बक्षीस होते. अध्यापक विद्यालय तासगाव येथील विद्यार्थिनी शुभांगी शहाजी माने यांना मिळाला असून त्यांच्या निबंधाचा विषय-भारतीय सण आणि पर्यावरण शिक्षण हा होता. तिसऱ्या क्रमांकासाठी रु. ५०१ व प्रमाणपत्र असे बक्षीस होते. वसंतराव नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय कळंबा कोल्हापूर येथील विद्यार्थिनी धनश्री महिपती पाटील यांना प्राप्त झाला आहे. उत्तेजनार्थ बक्षीसे दोन होती. त्याचे स्वरूप रु. १०१ व प्रमाणपत्र असे होते. पी.डी.व्ही.पी. महाविद्यालय तासगाव येथील विद्यार्थिनी धनश्री तानाजी पाटील यांना उत्तेजनार्थ प्रथम बक्षीस मिळाले आहे. त्यांच्या निबंधाचा विषय-माझा आवडता साहित्यिक हा होता. तसेच उत्तेजनार्थ मधील दुसरे बक्षीस वसंतराव नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालय कळंबा कोल्हापूर येथील विद्यार्थिनी प्राजक्ता भगवंत जाधव यांना मिळाला असून त्यांच्या निबंधाचा विषय-ऑनलाइन शिक्षण काळाची गरज हा होता. स्पर्धेत सहभागी असलेल्या सर्व स्पर्धकांना सहभागी प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. विजेत्यांचे बक्षीस व प्रमाणपत्र लवकरच त्यांना पाठवण्यात येईल.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य व प्राध्यापक यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले आहे. राज्यस्तरीय निबंध स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी प्रा.डॉ.एम.एस. उभाळे, प्रा. डॉ. ए.टी. पाटील, प्रा.डॉ.अर्चना चिखलीकर, प्रा. डॉ.लक्ष्मी भंडारे व ग्रंथपाल प्रा.ए.जी.पाटील यांनी प्रयत्न केले. तर श्री.आर. एस.कुंभार,श्री.शशिकांत कोठावळे व श्री.एच.टी.वाघमारे यांनी सहकार्य केले.

## महिला बी.एड. महाविद्यालयात जल दिन साजरा



तासगाव- येथील संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात जागतिक जलदिन उत्साहात साजरा करण्यात आला. सुरुवातीला स्नेहल पवार यांनी कार्यक्रमाचा उद्देश व रूपरेषा प्रास्ताविकातून सादर केली. त्यानंतर उर्मिला पाटील, राणी भोसले, कविता औताडे, मोहिनी पाटील आणि आफरीन नदाफ यांनी जागतिक दिना निमित्ताने समायोचित मनोगते व्यक्त केली. त्यानंतर प्रा. डॉ. एम. एस. उभाळे यांनी उपस्थित सर्व प्रशिक्षणार्थीना कडून जलप्रतिज्ञा वदवून घेतली. त्यानंतर त्यांनी जल दिनाचे महत्त्व या विषयावर आपल्या विचारांचे सादरीकरण केले.

त्यांनी सांगितले की, पाण्याचा सदुपयोगाचा संस्कार बालवयातच व्हावा. दैनंदिन जीवनात आपण अनेकदा पाण्याचा अपव्यय करत असतो. वृक्षतोडीमुळे पावसाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे पाण्याची जमिनीतील पातळी खोलवर जात आहे. त्यासाठी पाणी अडवणे व जिरवणे आवश्यक आहे.

त्यानंतर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील यांनी अध्यक्षीय मनोगत सादर केले. सूत्रसंचालन निशा वायदंडे तर आभार अभिव्यक्ति प्रतिक्षा पवार यांनी केली.

## महाविद्यालयात पालक मेळावा संपन्न



तासगाव- येथील संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात विद्यार्थिनींच्या पालकांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले होते. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले.प्रा. डॉ. लक्ष्मी भंडारे यांनी कार्यक्रमाची रूपरेषा व उद्देश प्रास्ताविकातून स्पष्ट केला. त्यानंतर प्राध्यापकांनी स्वतःची ओळख करून दिली. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते व विद्यार्थिनींचे पालक श्री. शरद रामचंद्र पाटील,माजी सैनिक व उपसरपंच निंबळक यांनी आपले मनोगत व्यक्त करताना त्यांनी विद्यार्थिनींना उद्देशून सांगितले की,महाविद्यालयात तुम्हाला सर्व सुविधा मिळतील पण विद्यार्थिनीनो तुम्हाला स्वतःचा विकास स्वतःच करायचा आहे. महाविद्यालयाकडून तुमच्या सर्व गरजांची पूर्ती केली जाईल,पण महाविद्यालयाचा दर्जा राखण्याचे काम तुम्हाला करायचे आहे. तुमचे भविष्य तुमच्याच हातात आहे. मिळालेल्या संधीचे सोने तुम्ही करावे. तुमचे पालक व महाविद्यालय त्यांची जबाबदारी पूर्ण क्षमतेने पार पाडतीलच त्यानंतर पालकांच्या वतीने स्त्री वक्त्या सौ. सुनीता कवडे यांनीही मनोगत व्यक्त करताना सांगितले की, आम्हा पालकांकडून महाविद्यालयास सर्व प्रकारचे सहकार्य मिळेल. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवण्याचा प्रयत्न करावा

त्यानंतर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.बी.एम. पाटील यांनी अध्यक्षीय मनोगतातून संस्थेचा व महाविद्यालयाचा इतिहास सांगून महाविद्यालयात चालणारे विविध अभ्यासक्रम उपक्रम याविषयी माहिती दिली.

सूत्रसंचालन प्रा.डॉ.लक्ष्मी भंडारे यांनी तर आभार अभिव्यक्ती प्रा. डॉ.अर्चना चिखलीकर यांनी केली.

## महिला बी.एड. महाविद्यालयात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जयंती साजरी



तासगाव- येथील संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम दैनंदिन परिपाठ कोळेकर अनुजा व कोळी चांदणी यांनी सादर केला. त्यानंतर डॉ. बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्रा.डॉ. लक्ष्मी भंडारे यांच्या हस्ते डॉ. बापूजी साळुंखे यांच्या वरील ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन झाले. प्रास्ताविकातून नेहा कोळेकर यांनी कार्यक्रमाचा उद्देश व रूपरेषा स्पष्ट केली.त्यानंतर प्रतीक्षा घाडगे, कोमल कदम, सोनाली काळे, सुषमा जाधव व ज्योती कांबळे यांनी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जीवनावर आधारित समयोचित मनोगते सादर केली.

प्रा. डॉ. लक्ष्मी भंडारे यांनी अध्यक्षीय मनोगत सादर केले. त्यांनी सांगितले की, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी बहुजन व सामान्य माणसांपर्यंत शिक्षण पोहोचवण्याचे महान कार्य केले. त्यांचे जीवन हे एक आदर्श जीवन होते. ते एक ध्येयवादी शिक्षक होते. शिक्षण प्रसारातून समाज परिवर्तनाचे स्वप्न पाहणारे ते थोर समाज चिंतक होते.त्यांनी स्थापन केलेल्या श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या वटवृक्षाखाली हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन स्वतःचे जीवन समृद्ध करीत आहेत.

## कु. सायली पाटील यांचा विद्यापीठ गुणवत्ता यादीत ७ वा क्रमांक



तासगाव– येथील संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थींनी कु. सायली शंकरराव पाटील यांचा विद्यापीठ गुणवत्ता यादीत ७ वा क्रमांक आला. असे शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचेकडून महाविद्यालयास कळविण्यात आलेले आहे. शिवाजी विद्यापीठाने मार्च २०२१ मध्ये घेतलेल्या बी. एड. परीक्षेत कु. सायली पाटील यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मला मिळालेल्या यशात महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग आणि शिक्षकेत्तर सेवकांचे मोठे सहकार्य लाभले. सर्व प्राध्यापकांनी आमच्या मध्ये सर्व प्रकारची अध्यापन कौशल्ये निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परीक्षेची उत्तम तयारी करून घेतली. असे कु. सायली पाटील यांनी यावेळी सांगितले.

आमच्या महाविद्यालयाचे मुख्य उद्दिष्ट ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना उत्तम दर्जाचे शिक्षक–प्रशिक्षण मिळावे आणि महाविद्यालयातून गुणवत्तापूर्ण शिक्षक तयार व्हावे हे आहे. त्यादृष्टीने आमचे महाविद्यालयात सातत्याने प्रयत्न सुरू असतात. कु. सायली पाटील यांच्या यशाने हे पुन्हा सिद्ध झालेले आहे. त्यांनी महाविद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. असे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील यांनी सांगितले.

## महिला बी. एड. महाविद्यालयात शैक्षणिक साधन निर्मिती कार्यशाळा व प्रदर्शन



तासगाव– येथील संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळा व प्रदर्शन उत्साहात संपन्न झाले. चार दिवसांच्या कार्यशाळेत महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील यांनी शैक्षणिक साधनांची संकल्पना, प्रकार व उपयोग यावर सैद्धांतिक माहिती सादर केली. त्यानंतर प्रा. सतीश उपळावीकर यांनी प्रत्यक्ष शैक्षणिक साधने निर्मिती प्रात्यक्षिक कार्यशाळा घेतली. त्यामध्ये विविध शैक्षणिक तक्ते, नकाशे, तरंग चित्रे, त्रिमिती साधने, प्रतिकृती व आलेख प्रशिक्षणार्थींनी कडून तयार करून घेतले. तसेच माती कामातून विविध त्रिमिती शैक्षणिक साधने प्रशिक्षणार्थींनींकडून बनवून घेतले.

समारोपाच्या कार्यक्रमात सोनाली सलगर यांनी कार्यक्रमाचा उद्देश सांगितला. त्यानंतर कार्यशाळेत सहभागी झालेल्या विद्यार्थिनी अनिता गायकवाड, मयुरी भोसले, राणी भोसले, मनीषा यादव, संध्या कुंभार आणि नदाप आफरीन यांनी कार्यशाळेतील अनुभव कथन केले. प्रा. डॉ. अर्चना चिखलीकर व प्रा. सतीश उपळावीकर यांनी मनोगते व्यक्त केली. तर प्राचार्य श्री. तोरसकर ए. बी. प्रमुख वक्ता म्हणून त्यांनी सांगितले की, शाळा–महाविद्यालयांतून मिळालेले ज्ञान व कौशल्य तुम्हाला जीवन जगण्यास मदत करतात, परंतु जीवन रसिकतेने जगण्यासाठी तुम्हाला कोणतीही एक कला अवगत असावी. तुम्ही तुमच्या कलेने ओळखले गेले पाहिजे. बोलणे, गाणे न्रुत्य, लिहिणे अशा अनेक कला आहेत. या कार्यशाळेत शैक्षणिक साधने तयार करण्याची मिळालेली कला तुम्हाला चांगला शिक्षक होण्यासाठी व जीवन सुंदर रीतीने जगण्यासाठी मदत करेल.

सोनाली सलगर यांनी सूत्रसंचालन तर उर्मीला पाटील यांनी आभार अभिव्यक्ती केली. कार्यक्रमाच्या नियोजनाचे मार्गदर्शन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील यांनी केले. तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. एम. एस. उभाळे, प्रा. डॉ. ए. टी. पाटील, प्रा. डॉ. लक्ष्मी भंडारे, प्रा. डॉ. अर्चना चिखलीकर व ग्रंथपाल प्रा. ए. जी. पाटील यांनी प्रयत्न केले. तर श्री. एस. आर. कुंभार, ग्रंथालय परिचर श्री. शशिकांत कोठावळे व श्री. एच. टी. वाघमारे यांचे सहकार्य लाभले.

## तासगाव महिला बी.एड. विद्यालयात सीईटी परीक्षा कार्यशाळा संपन्न



तासगाव:– येथील संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी विभागामार्फत शिक्षक पदासाठी आवश्यक असलेली शिक्षक अभियोग्यता चाचणी (TET) कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याअंतर्गत विविध तज्ञ मार्गदर्शकांच्या व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेची सुरुवात प्रार्थना व दीपप्रज्वलनाने झाली. प्रगती कोळी यांनी या कार्यशाळेचा उद्देश प्रास्ताविकातून स्पष्ट केला. सोनाली सलगर यांनी दैनंदिन परिपाठ सादर केला. प्रा. डॉ. लक्ष्मी भंडारे यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. कार्यशाळेच्या प्रथम सत्रातील व्याख्यानांमध्ये महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील यांनी TET परीक्षेचे स्वरूप व समाजशास्त्र या विषयाचे मार्गदर्शन केले.तसेच द्वितीय सत्रात प्रमुख पाहुणे डॉ.सुरेश माने (गटशिक्षणाधिकारी तासगाव) यांनी टीईटी व सीटीईटी परीक्षेचा अभ्यासक्रम व विविध क्लृप्त्या याबाबत मार्गदर्शन केले. तर प्रा.डॉ.ए.टी. पाटील यांनी बाल मानसशास्त्र या विषयाचे मार्गदर्शन केले. प्रा. डॉ.लक्ष्मी भंडारे यांनी मराठी व्याकरण या विषयाचे मार्गदर्शन केले.प्रा.डॉ.अर्चना चिखलीकर यांनी इंग्रजी व्याकरण या विषयाचे मार्गदर्शन केले. शीतल पाटील यांनी आभार अभिव्यक्ती तर कविता माळी यांनी सूत्रसंचालन केले.

कार्यशाळेच्या नियोजनाचे मार्गदर्शन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील यांनी केले.









## महाविद्यालयात ग्रंथालयातर्फे वाचन प्रेरणा दिन साजरा



तासगाव : येथील सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा वाढदिवस 'वाचन प्रेरणा दिवस' म्हणून महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभाग व सांस्कृतिक विभागातर्फे उत्साहात साजरा करण्यात आला. आदल्या दिवशी 'सलग वाचन उपक्रम' राबवण्यात आला. यामध्ये विद्यार्थिनींना ग्रंथालयातर्फे एक पुस्तक देऊन सलग दीड तास वाचन करण्यास सांगितले व वाचलेल्या भागावर आपले विचार लिहून काढण्यास सांगितले. सर्वच विद्यार्थिनींनी या उपक्रमात सहभाग घेतला.

महाविद्यालयातर्फे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृतिदिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. यांतर्गत सर्वप्रथम दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले. कोमल कदम यांनी प्रस्तावनेतून कार्यक्रमाचा उद्देश व रूपरेषा सांगितली.

त्यानंतर महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थींनी शितल माने, नेहा कोळेकर, ज्योती कांबळे, निशा वायदंडे यांनी पुस्तक परीक्षण व डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्यावरील आपले मनोगते सादर केली. त्यानंतर 'लेखक आपल्या भेटीला' या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील सर्वच प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांचा लेखन प्रवास विद्यार्थ्यांसमोर मांडण्यात आला. त्यामध्ये प्रा. डॉ. ए. टी. पाटील, एम. एस. उभाळे, डॉ. अर्चना चिखलीकर, प्रा. डॉ. लक्ष्मी भंडारे, प्र. प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील यांनी आपल्या लेखन कार्याविषयी मनोगते सादर केली. सूत्रसंचालन सोनाली सलगर व आभार अभिव्यक्ती पल्लवी माळी यांनी केली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.डॉ.एम.एस. उभाळे, प्रा.डॉ.ए.टी.पाटील, प्रा.डॉ.अर्चना चिखलीकर प्रा. डॉ. लक्ष्मी भंडारे व ग्रंथपाल प्रा. ए.जी.पाटील यांनी प्रयत्न केले. तर श्री.आर. एस.कुंभार,श्री.शशिकांत कोठावळे व श्री.एच.टी.वाघमारे यांनी सहकार्य केले.

## साळुंखे महिला बी.एड. महाविद्यालयास जिल्हास्तरीय युवा महोत्सवात यश




तासगाव : येथील संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी पेठ इस्लामपूर येथे झालेल्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील विविध कला प्रकारात भाग घेतलेला होता. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या तर्फे पेठ इस्लामपूर येथे विविध कला प्रकारांच्या युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले होते. त्यापैकी हिंदी वक्तृत्व स्पर्धेत महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी आफ्रिन नदाफ यांना तृतीय क्रमांक प्राप्त झालेला आहे. इस्लामपूर येथे झालेल्या युवा महोत्सवात सांगली जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेला होता. आफ्रिन नदाफ यांनी 'अंगदान–सर्वोत्तमदान' या विषयावर आपले विचार मांडले होते. त्यामध्ये त्यांचा तृतीय क्रमांक प्राप्त झाला. महाविद्यालय स्थापन झाल्या पासून शिवाजी विद्यापीठाच्या युवा महोत्सवामध्ये प्रथमच या महाविद्यालयाने हे यश संपादन केले आहे. त्यामुळे प्रशिक्षणार्थींच्या मनात युवा महोत्सवाबद्दल आत्मविश्वास वाढण्यास मदत झालेली आहे.

महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. आफ्रिन नदाफ यांनी सांगितले की, डॉ. एम. एस. उभाळे, डॉ. ए. टी पाटील, डॉ. अर्चना चिखलीकर, डॉ. लक्ष्मी भंडारे या सर्वांचे मार्गदर्शन लाभले त्यामुळेच सदरहु यश प्राप्त झाले.

## माहेर वार्षिक अंकाचे प्रकाशन व योगवर्ग अभ्यासक्रम पोस्टरचे उद्घाटन





तासगाव:– येथील सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२१–२२ च्या माहेर या वार्षिक अंकाचे प्रकाशन उत्साहात करण्यात आले. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या स्वागतानंतर श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते माहेर या वार्षिक अंकाचे प्रकाशन व शिवाजी विद्यापीठ मान्यताप्राप्त योगवर्ग अभ्यासक्रम पोस्टरचे उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी मा. अभयकुमार साळुंखे यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की, प्रत्येक महाविद्यालयाच्या वार्षिक अंकामध्ये त्या महाविद्यालयात राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचे प्रतिबिंब असते तसेच विद्यार्थिनींना अभिव्यक्त होण्यासाठी चांगले व्यासपीठ उपलब्ध होते आणि महाविद्यालयात चालणाऱ्या सर्व उपक्रमांची माहिती विद्यापीठ व समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी वार्षिक अंक हे प्रभावी माध्यम आहे. या कार्यासाठी सर्वांना शुभेच्छा देतो.

याप्रसंगी डॉ.बाबुराव गुरव, प्राचार्य डॉ. हुजरे सर, मा. व्ही. जे. म्हस्के , श्री. संजय नाईक, माजी विद्यार्थिनी अपर्णा पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा. डॉ. एम. एस. उभाळे यांनी आभार अभिव्यक्ती केली. कार्यक्रमाच्या नियोजनाचे मार्गदर्शन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.बी.एम.पाटील यांनी केले.



This Bulletin is Published by Director, Internal Quality Assurance Cell (IQAC) on be half of Principal, Sansthamata Sushiladevi Salunkhe Mahila Shikshanshastra Mahavidyalay Tasgaon, Dist. Sangli 416312